नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०५/२०२५ (गुरूवार)**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द ५ गुन्हे नोंद
## एकुण १ कोटी ४१ लाख ९० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
## भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— **दिनांक १४/०५/२०२५** रोजी भिवापुर पोलीसांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे भिवापुर पोलीसांनी ठिकठिकाणी नाकाबंदी करून खालील प्रमाणे कारवाई केली.

**कारवाई क्रं १ :—** पोलीसांनी तहसिल टी पाईंट, भिवापुर येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान **ट्रक क्र.एम एच ४९ बी. झेड ९१६८** हा मिळुन आला. त्यास थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक **वैभव रविदास शेन्डे, वय २३ वर्षे, रा. प्लॉट नं ११ अंतुजी नगर, भांडेवाडी, पारडी,नागपुर ,जि नागपुर याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही परवाना नव्हता. अधिक विचारपुस केली असता वाहन मालक अक्षय घाट, रा. खरबी, नागपुर, जि नागपुर** याच्या सांगण्यावरून अवैध्यरित्या रेतीची वाहतुक केली जात आहे अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१) ८ ब्रास रेती किंमती ४०,००० /— रूपये आणि २) ट्रक क्र.एम एच ४९ बी. झेड ९१६८ किंमती ३०,००,०००/— रूपये असा एकुण ३०,४०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं २ :—** पोलीसांना तास शिवार भिवापुर येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान **ट्रक क्र एम.एच ४० बी. एफ ११११२** मिळुन आला. वाहन थांबवून वाहनाची पाहणी

केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली . वाहन चालक **आरोपी समीर शेषराव नान्हे, वय २० वर्षे, रा. नवेगाव देशमुख, ता. भिवापुर, जि. नागपुर, हा मिळुन आला. त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही परवाना नव्हता. अधिक विचारपुस केली असता वाहन मालक निखील नागपुरे, रा. दिघोरी, नागपुर, जि. नागपुर** याच्या सांगण्यावरून अवैध्यरित्या रेती ची वाहतुक करीत असल्याची माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष नमुद वाहनामधुन १) ६ ब्रास रेती ३००००/— रूपये २) ट्रक क्र एम.एच ४० बी. एफ ११११२ किंमती २०,००,०००/— रूपये असा एकुण २०,३०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं ३ :—** पोलीसांना जवराबोडी पेट्रोलपंप समोर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान **ट्रक क्र.एम एच ४९ बी. झेड ०२५६** मिळुन आला. वाहन थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली . वाहन चालक **आरोपी प्रकाश सिताराम गायकवाड, वय ४२ वर्षे, रा. न्यु धामना, हुडकेश्वर ,नागपुर याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही परवाना नव्हता. अधिक विचारपुस केली असता वाहन मालक निखील प्रकाश साठवने, रा. साई नगर १, हुडकेश्वर, नागपुर** याच्या सांगण्यावरून अवैध्यरित्या रेती ची वाहतुक करीत असल्याची माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष नमुद वाहनामधुन १) ८ ब्रास रेती ४००००/— रूपये २) ट्रक क्र.एम एच ४९ बी. झेड ०२५६ किंमती ३०,००,०००/— रूपये असा एकुण ३०,४०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं ४ :—** पोलीसांना जवराबोडी पेट्रोलपंप समोर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान **ट्रक क्र एम.एच ४९ बी. झेड २८०७** मिळुन आला वाहन थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली . वाहन चालक **आरोपी टेकराम अशोक कुथे, वय २८ वर्षे, रा. नवेगाव बांध, ता. अर्जुनी मोरगाव. जि. गोंदिया ह. मु. योगेंश्वर नगर दिघोरी. नागपुर. जि नागपुर याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही परवाना नव्हता. अधिक विचारपुस केली असता वाहन मालक मधुकर भाजीपाले, रा. खरबी चौक ,नागपुर जि. नागपुर** याच्या सांगण्यावरून अवैध्यरित्या रेती ची वाहतुक करीत असल्याची माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष नमुद वाहनामधुन १) ८ ब्रास रेती ४०,०००/—**

**रूपये २) ट्रक क्र एम.एच ४९ बी. झेड २८०७ किंमती ३०,००,०००/— रूपये असा एकुण ३०,४०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं ५ :—** पोलीसांना जवराबोडी पेट्रोलपंप समोर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान **ट्रक क्र एम.एच ४९ बी. झेड ३९५९** मिळुन आला. वाहन थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली . **वाहन चालक आरोपी नामे राम रोहीदास खरूले, वय २४ वर्षे, रा जरीपटका, नागपुर, जि नागपुर याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही परवाना नव्हता. अधिक विचारपुस केली असता वाहन मालक देवीदास ढगे, रा. रेणुका गेटजवळ, म्हाळगी नगर, नागपुर, जि नागपुर याच्या सांगण्यावरून अवैध्यरित्या रेती ची वाहतुक करीत असल्याची माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष नमुद वाहनामधुन १) ८ ब्रास रेती ४०,०००/— रूपये २) ट्रक क्र एम.एच ४९ बी. झेड ३९५९ किंमती ३०,००,०००/— रूपये **असा एकुण ३०,४०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**सदर कारवाईत ३८ ब्रास रेती आणि पाच वाहन असा एकुण १,४१,९०,००० /— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद १० आरोपीतांच्या विरूध्द पोस्टे भिवापुर येथे कलम ३०३(२),३(५), ४९ भा. न्या. संहिता, बि एन एस. सहकलम ४८ (८),४८ (७) महा. जमीन महसुल अधिनीयम, सह कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम, सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. ,सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अन्वये **५ गुन्हे** दाखल करण्यात आले आहे. **नमुद गुन्हयातील चालक आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**




**अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद**
**स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी**

दिनांक १५/०५/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन अरोली हद्दीत अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी **वाकेश्वर शिवार** येथे नाकाबंदी केली असता एक **सोनालीका कंपनीचा विना क्रमांकाचा ट्रॅक्टर त्याला जोडुन विना क्रमांकाची ट्रॉली मिळुन आले.** वाहन थांबवुन वाहन चालकाला नाव पत्ता विचारला असता, **अतुल मनोहर रामटेके वय ३० वर्षे रा. पिंपळगाव ता. मौदा** अशी माहीती प्राप्त झाली.त्याला परवान्याबाबत विचारणा केली असता त्याच्या कडे परवाना नसल्याचे सांगितले. वाहन

मालकाचे नाव **आनंदराव बांते रा. पिंपळगाव ता. मौदा** असे असल्याची माहीती प्राप्त झाली. वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन पोलीसांनी पंचासमक्ष **१) १ ब्रास रेती किंमती ६,०००/—रूपये आणि २) एक सोनालीका कंपनीचा विना क्रमांकाचा ट्रॅक्टर त्याला जोडुन विना क्रमांकाची ट्रॉली किंमती ६,००,०००/— रूपये असा एकुण ६,०६,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

सदर प्रकरणी वाहन चालक आणि मालक याच्या विरूध्द पोस्टे आरोली येथे कलम ३०३(२), ४९(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७) ४८(८) म.ज म सहीता सहकलम ४.२१. खान खनिज अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **चालक आरोपीला अटक करण्यात आली आहे.**



## अवैधरित्या मोहाफुल दारू बाळगुन विक्री करणाऱ्या १० आरोपीतांविरूध्द १० गुन्हे नोंद.कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कळमेश्वर :— दिनांक १५/०५/२०२५ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फतीने अवैध दारू विक्रीबाबत माहीती मिळाली. मिळालेल्या माहीतीच्या आधारे वरून कळमेश्वर पोलीसांनी मौजा पारधी बेडा,गौंडखैरी येथे आरोपी नामे **१. दिनेश उर्फ दिन्या लक्ष्मण भोसले, वय ४० वर्षे ,रा पारधी बेडा , वार्ड क्र ०४ गोंडखैरी ,ता.कळमेश्वर,२. रंजित ज्ञानेश्वर मारवाडी, ३० वर्षे रा पारधी बेडा , वार्ड क्र ०४ गोंडखैरी ,ता.कळमेश्वर यांच्यासह ८ महीला आरोपीतांवर कारवाई करून त्यांचे ताब्यातुन मोहाफुल सडवा आणि मोहफुलांची गावठी दारू आसा एकुण २,६१,०००/— रूपयांचा मुद्दे्माल जप्त करून १० आरोपीतांविरूध्द १० गुन्हे नोंद करण्यात केले आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या १० आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. सावनेर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन सावनेर :— दिनांक १४/०५/२०२५ रोजी सावनेर पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की प्रोफेसर कॉलनी , सावनेर च्या मागील जागेत झाडा—झुडपात काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचुन सापळा रचुन धाड टाकली असता आरोपी नामे **१.उमेश प्रकाश ठाकरे,वय २० वर्ष रा. वार्ड क्र ०३ गुजर खेडी सावनेर, २. हरीश शंकर आमगांवकर, वय १९ वर्षे ,रा. वार्ड क १६, पहलेपार, सावनेर, ३.रितेश रविंद्र गोंडुले, वय २४ वर्षे, रा. वार्ड क्र ३, तेलगॉव, सावनेर, ४. अशोक बापुराव गजरे, वय २० वर्षे, रा. वार्ड क्र ११, छोटा पुलीया जवळ, पहलेपार, ५. सचिन श्रीराम भोपाटे, वय १८ वर्ष रा. यशवंत बाबानगर झोपडपटटी सावनेर, ६.हर्षल घनश्याम डेरे, वय २३ वर्ष, रा. प्रोफेसर कॉलनी चे मागे सावनेर, ७. देवांश विनायक सोनारे ,रा. यशवंत बाबानगर झोपडपटटी सावनेर आणि ८. एक विधीसंघर्षग्रस्त बालक हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना जागीच सापडले.**

तसेच आरोपी नामे ९. रोहित गजरे रा प्रोफेसर कॉलनी आणि १०. सोनु सोमकुवर रा. कांची मोहल्ला, पहलेपार, सावनेर हे पोलीसांना पाहुन पळुन गेले. आरोपीतांच्या **ताब्यातुन ५२ तास पत्ते व रोख रक्कमेसह ६ दुचाकी वाहने असा २,८२,०४० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन सावनेर येथे १२ म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने